# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगपालिका क्षेत्राच्या वाढीव हद्दीसाठी विकास योजना तयार करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(३) अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत.
**{न.र. आणि मु. विभाग}**

नागपूर शहराची विकास योजना (पहिली सुधारित) शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३०० (अ)-९७- नवि-९, दि.०७/०१/२००० अन्वये भागश: मंजुर झाली असुन ती दि. ०१/०३/२००० पासुन अंमलातआलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.२००-२०००-नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

प्रकरणी शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र.नामपा-२०११-प्र.क्र.१-नवि-२६, दि.१४/०५/२०१३ अन्वये मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा- नरसाळा हे दोन मौजे नागपूर महानगर क्षेत्रातून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून, शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीस-२४१३-४०५-प्र.क्र.२१३-नवि-९, दि.१४/१०/२०१३ अन्वये मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा- नरसाळा क्षेत्राकरिता महानगर पालिका नागपूर ला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. सबब सदर वाढीव क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) नुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून ३ वर्षाच्या कालावधीत म्हणजेच दि.१३/०५/२०१६ पर्यंत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये उक्त वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करून नागपूर महानगर पालिकेने (नियोजन प्राधिकरण) शासनास दि.१३/०४/२०१८ रोजी सादर केली होती. उक्त अधिनियमाचे कलम २१(३) अन्वये मुदतवाढ देण्याचे अधिकार शासन निर्णय क्र. टीपीस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३,दि.०१/१२/२०१६ अन्वये मा. सहसंचालक, नगर रचना नागपूर विभाग यांना प्रदान केलेले असल्याने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. वि.यो./मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा(वा.क्षेत्र.) कलम-२१(३) मु.वा./सहसंचानाग/१९५३, दि.१७/१२/२०१८ अन्वये दि.१४/०५/२०१६ ते दि. १३/०५/२०१८ पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे.

तद्नंतर नागपूर महानगरपालिकेचे वाढीव हद्दीत समाविष्ट मौजा हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा या मौजांची प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपाना/प्रा.वि.यो.हु.(बु.) व नरसाळा/कलम-३०/नरवि/१३३, दि.१३/०४/२०१८ अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर केले असता शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. टिपीएस-२४१८/८८४/प्र.क्र.८७/२०१९/नवि-०९, दि.२७/०५/२०१९ नुसार उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा - नरसाळा गावाच्या विकास योजनेस मंजुरी देण्यास नकार देऊन उक्त क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेला निदेश देण्यात आलेले आहेत. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१६४७/प्र.क्र.२५२/१८/नवि-१३, दि. १५/१०/२०१८, उक्त अधिनियमाचे कलम- १५४ अन्वये विकास योजना सुधारित करताना मुळ हद्द व वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रितरित्या तयार करणे बाबत निदेश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) नुसार सदर वाढीव क्षेत्रासाठी वैधानिक कार्यवाही पूर्ण करून विकास योजना ३ वर्षाच्या कालावधीत म्हणजेच दि.१३/०५/२०१६ रोजीपर्यंत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक होते. परंतु वरीलप्रमाणे नमूद कारणांमुळे नागपूर महानगरपालिकेला वाढीव हद्दीकरिता स्वतंत्ररीत्या विकास योजना तीन वर्षाच्या कालावधीत शासनास मंजुरीसाठी सादर करणे शक्य झालेले नाही. तरी वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार वाढीव क्षेत्राची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम-३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करण्यासाठी अधिनियमाचे कलम-२१(३) नुसार दि १४/०५/२०१६ पासून दि.१३/०६/२०२७ पर्यंत मुदतवाढ करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 31/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 21/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगपालिका क्षेत्राच्या वाढीव हद्दीसाठी विकास योजना तयार करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(३) अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत.

नागपूर शहराची विकास योजना (पहिली सुधारित) शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३०० (अ)-९७- नवि-९, दि.०७/०१/२००० अन्वये भागश: मंजुर झाली असुन ती दि. ०१/०३/२००० पासुन अंमलातआलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.२००-२०००-नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि. २१/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

प्रकरणी शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र.नामपा-२०११-प्र.क्र.१-नवि-२६, दि.१४/०५/२०१३ अन्वये मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा- नरसाळा हे दोन मौजे नागपूर महानगर क्षेत्रातून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून, शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीस-२४१३-४०५-प्र.क्र.२१३-नवि-९, दि.१४/१०/२०१३ अन्वये मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा- नरसाळा क्षेत्राकरिता महानगर पालिका नागपूर ला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. सबब सदर वाढीव क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) नुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून ३ वर्षाच्या कालावधीत म्हणजेच दि.१३/०५/२०१६ पर्यंत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये उक्त वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करून नागपूर महानगर पालिकेने (नियोजन प्राधिकरण) शासनास दि.१३/०४/२०१८ रोजी सादर केली होती. उक्त अधिनियमाचे कलम २१(३) अन्वये मुदतवाढ देण्याचे अधिकार शासन निर्णय क्र. टीपीस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-

१३,दि.०१/१२/२०१६ अन्वये मा. सहसंचालक, नगर रचना नागपूर विभाग यांना प्रदान केलेले असल्याने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. वि.यो./मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा(वा.क्षेत्र.) कलम-२१(३) मु.वा./सहसंचानाग/१९५३, दि.१७/१२/२०१८ अन्वये दि.१४/०५/२०१६ ते दि. १३/०५/२०१८ पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे.

तद्नंतर नागपूर महानगरपालिकेचे वाढीव हद्दीत समाविष्ट मौजा हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा या मौजांची प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपाना/प्रा.वि.यो.हु.(बु.) व नरसाळा/कलम-३०/नरवि/१३३, दि.१३/०४/२०१८ अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर केले असता शासन नगर विकास विभाग निर्णय क्र. टिपीएस-२४१८/८८४/प्र.क्र.८७/२०१९/नवि-०९, दि.२७/०५/२०१९ नुसार उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये मौजा - हुडकेश्वर (बु.) व मौजा - नरसाळा गावाच्या विकास योजनेस मंजुरी देण्यास नकार देऊन उक्त क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेला निदेश देण्यात आलेले आहेत. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१६४७/प्र.क्र.२५२/१८/नवि-१३, दि. १५/१०/२०१८, उक्त अधिनियमाचे कलम- १५४ अन्वये विकास योजना सुधारित करताना मुळ हद्द व वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रितरित्या तयार करणे बाबत निदेश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) नुसार सदर वाढीव क्षेत्रासाठी वैधानिक कार्यवाही पूर्ण करून विकास योजना ३ वर्षाच्या कालावधीत म्हणजेच दि.१३/०५/२०१६ रोजीपर्यंत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक होते. परंतु वरीलप्रमाणे नमूद कारणांमुळे नागपूर महानगरपालिकेला वाढीव हद्दीकरिता स्वतंत्ररीत्या विकास योजना तीन वर्षाच्या कालावधीत शासनास मंजुरीसाठी सादर करणे शक्य झालेले नाही. तरी वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार वाढीव क्षेत्राची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम-३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करण्यासाठी अधिनियमाचे कलम-२१(३) नुसार दि १४/०५/२०१६ पासून दि.१३/०६/२०२७ पर्यंत मुदतवाढ करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.